## नियमित दिवाणी दावा क्र.८९/२०२५ मधील अर्ज (नि.क्र.३०) वरील आदेश
## (अश्विनी जगदाळे वि. उषा जगताप व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचे विरुद्ध झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार, प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेवर समन्सची बजावणी दि.०९.०४.२०२५ रोजी झाली. त्यानंतर प्रतिवादी यांनी दि. २५.०४.२०२५ रोजी न्यायालयामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ रुल २१ नुसार अर्ज दिला होता. सदर अर्ज न्यायालयाने नामंजूर केला आहे. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याकामी कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे व आजारपणामुळे त्यांना प्रस्तुत दाव्यात त्यांचे म्हणणे देता आले नाही व न्यायालयाने त्यांच्याविरुध्द विना म्हणणे आदेश पारीत केला आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा आदेश रद्द करुन कैफियत देण्यास परवानगी मागितली आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व प्रस्तुतचा अर्ज हा जास्तीत–जास्त खर्च लावून नामंजुर करणेची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुद्ध निरंतर ताकिद मिळण्यासाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दि.०९.०४.२०२५ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. परंतु, ते न्यायालयात हजर होवून त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादींनी विहित मुदतीत त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांचे महत्त्वाचे हक्क हितसंबंध असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादींना लेखी कैफियत सादर करुन त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या कारणामुळे न्यायोचित वाटते. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालून निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांची कैफियत

सादर करुन त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे न्यायोचित दिसून येत आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कैफियत देण्यासाठी केलेला विलंब विचारात घेता प्रतिवादींनी वादी यांना खर्चाची र.रु.५००/- देणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा सदरचा अर्ज हा खर्च/कॉस्ट र.रु.५००/- वादींना पुढील तारखेला किंवा तत्पूर्वी देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2025.12.20 11:23:31 +0530

फलटण. ( ए. एस. साटोटे )

दिनांकः-१९.१२.२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण